अमरावती महानगरपालिका अमरावती

स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि./ 935/2026 दिनांक :- 15 / 9 /2026

कोटेशन मागविण्याबाबत सूचना

विषय :- प्लास्टिक साहित्याची जाडी मोजण्यासाठी प्लास्टिक थिकनेस गेज मशीन (Plastic Thickness Gauge) खरेदी करण्याकरिता दरपत्रक (कोटेशन) मागविणेबाबत.

स्वच्छता विभागामार्फत प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई तसेच प्लास्टिक साहित्याची तपासणी करताना प्लास्टिकची जाडी मोजण्यासाठी प्लास्टिक थिकनेस गेज मशीन आवश्यक आहे. तरी इच्छुक व पात्र अधिकृत विक्रेते/पुरवठादार यांचेकडून खालील साहित्याकरिता बंद लिफाफ्यात दरपत्रक (Quotation) मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर प्रतिनग
1	प्लास्टिक थिकनेस गेज मशीन (Plastic Thickness Gauge)	१ नग	

कोटेशनमध्ये नमूद करावयाच्या बाबी :-

1. उपकरणाची कंपनी/ब्रँड व मॉडेल क्रमांक.
2. मोजमापाची क्षमता व अचूकता (Accuracy).
3. GST सहित व GST वगळून दर स्वतंत्रपणे नमूद करावा.
4. वाहतूक, पॅकिंग व इतर सर्व शुल्काचा समावेश करावा.
5. उपकरणाची वॉरंटी/गारंटी कालावधी नमूद करावा.
6. पुरवठ्याचा कालावधी नमूद करावा.
7. अधिकृत विक्रेता असल्यास त्याबाबतचा पुरावा जोडावा.
8. कोटेशनसोबत GST नोंदणी प्रमाणपत्र व PAN ची प्रत जोडावी.
9. उपकरणासोबत आवश्यक प्रमाणपत्रे, वापर पुस्तिका व इतर साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.
10. महानगरपालिकेस कोणतेही कोटेशन स्वीकारण्याचा अथवा कोणतेही/सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार राहील.

इच्छुक पुरवठादारांनी आपले दरपत्रक **दि.** 21/09/2026 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत स्वच्छता विभाग, अमरावती महानगरपालिका येथे सादर करावे.

वैद्यकिय अधिकारी (स्वच्छता)
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner